# कृषि विज्ञान केंद्र, धुळे हे जिल्हा स्तरावरील मिनी कृषि विद्यापीठ म्हणून उदयास यावे

डॉ. प्रशांतकुमार पाटील, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कृषि विज्ञान केंद्राची ३० वी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक दिनांक २७/०५/२०२१ रोजी आदरणीय डॉ. प्रशांतकुमार पाटील, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाली. या बैठकीसाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. शरद गडाख, संचालक विस्तार शिक्षण तथा संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी, मा. डॉ. लाखन सिंग, संचालक, अटारी, पुणे, मा. डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे, मा. श्री. विवेक सोनवणे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

कृषि विज्ञान केंद्राच्या सन २०२० चा कार्याचा आढावा डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांनी चित्रफीतीच्या स्वरुपात सादर करुन तदनंतर सविस्तरपणे कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या विभागवार कामांचे सादरीकरण केले. यामध्ये कृषि विज्ञान केंद्राने आद्यरेखा पिक प्रात्यक्षिक, शेतावरील प्रयोग, समुह आद्यरेखा पिक प्रात्यक्षिके, ऑनलाईन पध्दतीने प्रशिक्षणे, ऑनलाईन गटचर्चा, शेतीविषयक संदेश तसेच कृषि विज्ञान केंद्रामार्फत राबविल्या जाणारे विविध प्रकल्प उदा. सिड हब, प्रो. सॉईल, राष्ट्रीय कृषि विकास योजना, देसी, एफ.एस.एन., इ. चे सविस्तर सादरीकरण केले. तसेच कृषि विज्ञान केंद्रामार्फत २०२१ मध्ये राबविण्यात येणाऱ्या कामाचा कृति आराखडा सविस्तर विषद केला.

मा. डॉ. प्रशांतकुमार पाटील, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी यांनी अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करतांना कृषि विज्ञान केंद्र हे ज्ञान प्रसारणाचे केंद्र म्हणून उदयास येत असून कृषि विज्ञान केंद्रानी कृषि विभाग, आत्मा, बिगर सरकारी संस्था यांच्या सोबत मेळ घालून शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करन गरजेच आहे. कृषि विज्ञान केंद्र हे जिल्हा स्तरावर कृषि विद्यापिठाचे प्रतिबिंब असून कृषि विज्ञान केंद्रांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यात महत्वाची भुमीका बजावत आहे. कृषि विज्ञान केंद्राने धुळे जिल्ह्यातील पिक पध्दती नुसार शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस सेंद्रिय शेतीतील शेतकऱ्यांचा वाढता सहभाग बघता विषमुक्त शेतीकडे वाटचाल करतांना सेंद्रिय शेतीचे क्षेत्र वाढविणे गरजेचे झाले आहे. त्याकरिता शेतकरी बाधंवाना सेंद्रिय शेतीचे महत्व व भविष्यातील त्याला असलेला वाव या दृष्टिने कृषि विज्ञान केंद्राने वाटचाल करणे गरजेचे आहे. टाकाऊ पासुन टिकाऊ करतांना कंच्च्या मालापासून प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करणारे उद्योजक घडविणे गरजेचे आहे.

मा. डॉ. शरद गडाख, संचालक विस्तार शिक्षण तथा संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी यांनी कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल तयार करुन शेतकरी बांधवांनी अशा एकात्मिक शेती पध्दती मॉडेल चा अंगीकार करुन आपल्या उत्पन्नात व उत्पादनात वाढ घडवुन आनावे असे प्रतिपादन केले. विद्यापीठाच्या नविन वानांचा तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसाराकरीता खरीप व रब्बी हंगामात तंत्रज्ञान सप्ताहाचे आयोजन करणे आवश्यक आहे. त्या सोबत सेंद्रिय शेती पध्दतीचे मॉडेल तयार करुन आदर्श गाव तयार करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिने कृषि विज्ञान केंद्राने महत्वाची भुमीका बजावने आवश्यक आहे.  कृषि विज्ञान केंद्राने

आकाशवाणी, दुरदर्शन व इतर डिजिटल माध्यमांचा वापर करुन शेतकऱ्यांना कृषि साक्षर करणे महत्वाचे असून त्यामध्ये कृषि विज्ञान केंद्र महत्वाची भुमिका बजावत आहे.

मा. डॉ. लाखन सिंग, संचालक, अटारी, पुणे यांनी अपल्या मार्गदर्शनात कृषि विज्ञान केंद्र हे देशात ९ व्या क्रमांकावर असून कृषि विज्ञान केंद्राचा कार्याचा गौरव उल्लेख केला. यामध्ये कृषि विज्ञान केंद्राने नाविन्यपुर्ण प्रयोग सातत्याने धुळे जिल्ह्यात राबवुन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीकोणातून महत्वाची भुमिका बजावत आहे त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. कृषि विज्ञान केंद्र हे शेतकऱ्याचे हक्काचे माहिती तंत्रानाचे स्त्रोत असल्याने कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावरील नाविन्यपुर्ण बाबी व तंत्रज्ञानाचा आपल्या शेतावर अवलंब करणे अत्यावश्यक असल्याचे तसेच दुर्गम व अति दुर्गम भागापर्यंत तंत्रज्ञान पोहोचने आवश्यक असल्याचे नमुद केले.

मा. श्री. विवेक सोनवणे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे यांनी कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग हे एकाच रथाची दोन चाके असून दोघांचा समन्वय उत्तम असल्याने गुलाबी बोंड अळी नियंत्रणामध्ये धुळे जिल्ह्याने उत्तम कामगीरी केली असून राज्य पातळीवर नाव लौकीक संपादीत केला. यापुढे देखील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी कृषि विभाग आणि कृषि विज्ञान केंद्र हे हातात हात घालुन काम करतील अशी ग्वाही दिली.

मा. डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे यांनी कृषि विज्ञान केंद्राचे स्थान हे मध्यवर्ती असल्याने शेतकऱ्यांना विद्यापीठाने उत्पादीत केलेल्या निविष्ठा एकाच ठिकाणी मिळण्यासाठी विक्री केंद्र उभारण्यासंदर्भात पुढाकार घेणे संदर्भात आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांना हंगाम निहाय, पिक निहाय व गरजे नुसार प्रशिक्षण देण्याबाबत सुचित केले.

आजच्या बैठकीमध्ये कृषि विज्ञान केंद्र निर्मीत देशी गौवंश व गुलाबी बोंड अळी नियंत्रण या घडीपत्रीकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. धुळे जिल्ह्यातील शेतकरी श्री. हितेंद्र गिरासे, तावखेडा ता. शिंदखेडा, जिल्हा धुळे, सौ. रेणुकाताई चव्हाण, पाडळदे, ता धुळे, श्री उमेश देशमुख, मोहपाडा, ता. साक्री यांनी कृषि विज्ञान केंद्राने केलेल्या कार्याचा अभिप्राय देऊन त्यांच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य म्हणून श्री. विवेक पाटील, जिल्हा प्रबंधक, नाबार्ड, धुळे, श्री. एस.डी. मालपुरे, उपसंचालक, आत्मा, धुळे, डॉ. खलाणेकर, उपायुक्त पशुसंवर्धन, धुळे, श्री संदिप गोरडे, विभागीय व्यवस्थापक, सहकार व विपणन, धुळे, डॉ. शिरिश गाताडे, सहाय्यक आयुक्त, मत्स्य विभाग, धुळे, श्री मोहन दास, जिल्हा व्यवस्थापक, अग्रनी बँक, धुळे, श्री. रोशन जाधव, प्रसारन अधिकारी, आकाशवाणी, धुळे, श्री. एस.ए. भामरे, व्यवस्थापक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, धुळे, श्री. प्रसाद महाजन, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी, धुळे , डॉ. सुरेश दाडके, गहु विशेतज्ञ, गहु संशोधन केंद्र, निफाड, डॉ. दत्तात्रय कुसाळकर, सहयोगी संशोधन संचालक, भात संशोधन केंद्र, इगतपुरी, डॉ. सुदाम पाटील, प्रमुख शास्त्रज्ञ तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव, डॉ. राहुल देसले, प्राचार्या, कृषि तंत्र विद्यालय, धुळे, श्री. कोतकर, जिल्हा व्यवस्थापक, महाबिज, धुळे इत्यादी सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त करुन कृषि विज्ञान केंद्राकडून असलेल्या अपेक्षा कृति आराखडा २०२१ मध्ये अंतर्भुत करण्या संदर्भात सुचना केल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. जगदिश काथेपुरी, शास्त्रज्ञ कृषि विद्या यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. रोहित कडू शास्त्रज्ञ उद्यान विद्या यांनी केले. सदर शास्त्रीय सल्लागार समितीच्या बैठकीच्या यशस्वितेसाठी डॉ. पंकज पाटील, डॉ. धनराज चौधरी, डॉ. अतीश पाटील, सौ. प्राची काळे, श्री. जयराम गावीत, श्री. स्वप्नील महाजन, श्री. बाळू वाघ, श्री. कुमार भोये यांनी परीश्रम घेतले.




मा. डॉ. प्रशांतकुमार पाटील, कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी मार्गदर्शन करतांना सोबत बैठकिस उपस्थित विविध विभागांचे प्रमुख, मान्यवर व शेतकरी प्रतिनिधी